बसीन कॅथॉलिक को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

कॅथॉलिक बँक बिल्डिंग, पापडी नाका, पापडी, वसई (पश्चिम), ता.वसई, जि. पालघर (एमएस) ४०१२०७
संपर्क क्र. : ९१४६००८८४६/७४४७४५६८५६, ७४४७७६२२११

## विक्री सूचना

जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३ (४) नुसार आणि एसपीएल दावा क्र. २१ सन २०१४ मध्ये सन्माननीय एमपीआयडी विशेष न्यायालयच्या मार्गदर्शनानुसार प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कब्जात घेतलेली येथे वर्णन केलेली स्थावर मिळकत खाली दिलेल्या अटी आणि शर्तींवर सदर सूचनेत दिलेल्या तारीख, ठिकाण आणि वेळेस ''जे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे आणि विना हरकत तत्त्वावर'' जनतेकडून प्रस्ताव निमंत्रित करून विकण्यात येईल. खाली सविस्तर वर्णन केलेल्या मिळकतीच्या खरेदीकरिता जनतेकडून मोहोरबंद पाकिटातून प्रस्ताव निमंत्रित करण्यात येत आहेत.

(ए)

| अ. क्र. | कर्जदार (एनपीए) चे नाव | मागणी सूचनेनुसार थकीत रक्कम (रु.) | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत आणि इअर | लिलाव आणि निरीक्षणाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. संतोष तुकाराम काजरोलकर आणि इतर<br>मिरा रोड<br>एसएसएलएन २६३५ | ३०,८१,३९७/- | फ्लॅट क्र. ३०५, ३ रा मजला, कांचन जंगा सीएचएस लि., जेसल पार्क, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), मोजमापित क्षेत्र ४०.१५ चौ.मीटर्स बिल्ट अप | ४५,३७,८००/- (राखीव किंमत) आणि ४५३८००/- (इअर) | २० जुलै, २०२१ रोजी स. ११.०० वा. लिलाव<br>१ जुलै, २०२१ रोजीस स. ११ ते दु. १.०० वा. निरीक्षण |

(बी) तारण धनकोंचा पत्ता : बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि. (शेड्युल्ड बँक), कॅथॉलिक बँक बिल्डिंग, पापडी नाका, पापडी, वसई (पश्चिम), जि. - पालघर.

(सी) ज्याच्या वसुलीसाठी मिळकत विकावयाची आहे ते तारण कर्ज :- दिनांक ०९.०५.२०१७ रोजीच्या मागणी सूचनेनुसार रु. ३०,८१,३७६/- (रुपये तीस लाख एक्याऐंशी हजार तीनशे शहात्तर मात्र) सह ०१.०५.२०१७ पासूनचे पुढील व्याज आणि अन्य आकार.

(डी) जनतेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव उघडण्याची तारीख, वेळ आणि ठिकाण :- २०.०७.२०२१ रोजीस स. ११.०० वा. बॅसीन कॅथॉलिक को-ऑपरेटीव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक), वसुली विभाग, श्रीजी आर्केड, तांदुळ बाजार जवळ, बाभोळा बंगली रोड, वसई (पश्चिम), जि. पालघर.

विक्रीच्या अटी आणि शर्ती :-

१) प्राधिकृत अधिकाऱ्यांना उद्देशून मोहोरबंद पाकिटातील प्रस्ताव, ''बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि.'' च्या नावातील डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर स्वरुपातील रु.४,५३,८००/- (रुपये चार लाख त्रेपन्न हजार आठशे फक्त) च्या इसारा अनामत रक्कमेसह (इअर) सह जोडून प्राधिकृत अधिकारी, बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि. (शेड्युल्ड बँक), वसुली विभाग, श्रीजी आर्केड, तांदुळ बाजार जवळ, बाभोळा बंगली रोड, वसई (पश्चिम), जि. पालघर यांचेकडे लिलावासाठी ठरवलेल्या वेळेच्या एक तास अगोदर सादर केले पाहिजेत. प्रस्ताव अर्ज हे प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे रु. २००/- च्या देयावर उपलब्ध आहेत.

२) प्रस्तावासोबत आधार कार्ड, पासपोर्ट, व्होटर्स आयडी, ड्रायव्हिंग लायसन्स, आयकर विभागाने जारी केलेले पॅन कार्ड किंवा बँकेकडून स्वीकारली जाईल अशा अन्य वैध छायाचित्र ओळख पुराव्याच्या स्वसाक्षांकित किंवा प्रतिसाक्षांकित प्रतिलाही जोडावे.

३) प्रस्ताव असलेल्या मोहोरबंद पाकिटावर ठळकपणे **'मिळकतीच्या खरेदीकरिता प्रस्ताव'** असे लिहावे.

४) इअरशिवाय प्राप्त होणारे प्रस्ताव तडकाफडकी फेटाळण्यात येतील.

५) इअरसाठीचा डीडी/पीओ लिलावाच्या तारखेपर्यंत वटवला/रोख केला जाणार नाही आणि अयशस्वी प्रस्तावकर्त्यांना परत करण्यात येईल. इअर रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

६) विक्रीसाठीचे मोहोरबंद प्रस्ताव बँकेचे प्राधिकृत अधिकारी २०.०७.२०२१ रोजीस स. ११.०० वा. उपस्थित असलेल्या प्रस्तावकर्त्यांच्या उपस्थितीत उघडतील. प्राधिकृत अधिकारी यांच्या मर्जीने बोली उघडल्यानंतर आपापसात बोली लावण्याची किंवा त्यांच्या स्वेच्छेप्रमाणे रकमेच्या पटीत रक्कम वाढविण्याची अनुमती प्रस्तावकर्त्यांना देऊ शकतील.

७) यशस्वी प्रस्तावकर्ते/बोलीदार यांनी बोली रकमेच्या २५% रक्कम (इअर धरून) त्याच्या/तिच्या नावे विक्री निश्चित झाल्यावर ताबडतोब जमा करावी लागेल. कसूर केल्यास इअर रक्कम जप्त होईल. उर्वरित बोली रक्कम (विक्री किंमत) विक्री निश्चितीच्या तारखेपासून १० दिवसांत किंवा प्राधिकृत अधिकारी विनिर्दिष्ट करतील अशा अन्य कोणत्याही तारखेस जमा करावी लागेल.

८) जर विक्री निश्चितेच्या तारखेपासून १० दिवसांत किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही तारखेपर्यंत बोली रकमेची उर्वरित ७५% रक्कम प्रदान करण्यास यशस्वी प्रस्तावकर्ते/बोलीदार यांनी कसूर केल्यास त्याने/तिने जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल आणि पुन्हा मिळकतीची विक्री करण्यास बँक मुक्त असेल. कसूरवार प्रस्तावकर्ते/बोलीदार यांना त्यांनी जमा केलेल्या रकमेवर आणि लिलाव केलेल्या मिळकतीवर कोणताही दावा करता येणार नाही.

९) यशस्वी प्रस्तावकर्ते/बोलीदार यांनी सर्व कायदेशीर/अनुषंगिक परिव्यय, जसे की मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, स्थानिक कर, को-ऑप सोसायटीची देयके, विज बिले, वैधानिक देणी, टीडीएस आणि/किंवा लिलाव केलेल्या मिळकतीशी निगडीत अन्य कोणतीही थकबाकी भरावी लागेल.

१०) विक्री तारण धनको/बँकेच्या मंजुरी अधीन राहील.

११) कोणतेही कारण न देता सर्व किंवा कोणतेही प्रस्ताव/बोली फेटाळण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवत आहेत आणि/किंवा मोहोरबंद प्रस्ताव उघडणे/पुढे ढकलण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार असतील.

१२) प्राधिकृत अधिकारी त्यांच्या मर्जीने पूर्वसूचनेशिवाय सदर सूचनेच्या कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये फेरफार करण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

१३) इच्छुक पक्षकार मिळकतीचे निरीक्षण ०१.०७.२०२१ रोजी स. ११.०० ते दु. १.०० दरम्यान करू शकतील.

१४) कोणत्याही पुढील तपशिलासाठी इच्छुक पक्षकार कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि. (शेड्युल्ड बँक), वसुली विभाग, श्रीजी आर्केड, तांदुळ बाजार जवळ, बाभोळा बंगली रोड, वसई (पश्चिम), जि. पालघर. मोबाईल क्र. ९१४६००८८४६,७४४७४५६८५६,७४४७७६२२११ आणि अन्य [illegible]